|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

जा.क्र.कबचौउमवि/7-क/शिक्षणशास्त्र/391/2025 दिनांक:- 28/01/2026

प्रति,
मा. प्राचार्य, / प्राचार्या,
कबचौउमविशी संलग्नित सर्व शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालये यांना...

**विषय :-** परीक्षा उन्हाळी – 2026 मध्ये होणाऱ्या B.Ed. अभ्यासक्रमाच्या परीक्षेकरीता अध्यादेश 67 नुसार अतिरीक्त संधीबाबत.

**महोदय / महोदया,**

उपरोक्त विषयान्वये आपण आपल्या महाविद्यालयातील काही विद्यार्थ्यांचे परीक्षा उन्हाळी – 2026 मध्ये होणाऱ्या **B.Ed.** अभ्यासक्रमाच्या परीक्षेस प्रविष्ठ होणेसाठी अतिरीक्त संधी मिळणेकरीता विनंती अर्ज विद्यापीठास सादर केलेले आहेत.

त्या अनुषंगाने, प्राप्त आदेशान्वये आपणास कळविण्यात येते की, खालील तक्ता - **" अ "** मध्ये नमूद केलेल्या विद्यार्थ्यांना अध्यादेश ६७ मधील तरतुदीनुसार मा.कुलगुरू महोदयांनी परीक्षा उन्हाळी – 2026 मध्ये होणा-या परीक्षेसाठी अतिरिक्त संधी उपलब्ध करून दिलेली आहे. तसेच ज्या विद्यार्थ्यांना संधी मंजूर केलेली नाही त्यांची नावे तक्ता **" ब "** मध्ये नमूद केलेली आहेत. सदर बाब संधी प्राप्त विद्यार्थ्यांच्या निर्दशनास त्वरीत आणून देवून, त्यांचे परीक्षा अर्ज नियमीत परीक्षा शुल्क + (अधिक) अतिरीक्त परीक्षा शुल्क एक व दोन विषयांसाठी रु. 1300/- आणि दोन पेक्षा जास्त विषयांसाठी प्रती विषय रू. 650/- या प्रमाणे परीक्षा शुल्क स्विकारून महाविद्यालयाने सदर विद्यार्थ्याचे परीक्षा अर्ज विद्यापीठ कार्यालयात **दि.30/01/2026** पर्यंत जमा करावेत. सदर परीक्षा अर्जासोबत त्या अभ्यासक्रमाच्या सर्व वर्गाच्या आजतागायत मिळालेल्या गुणपत्रकांच्या छायांकित प्रती जोडणे आवश्यक आहे. **दि.30/01/2026** नंतरचे प्राप्त होणारे संधीचे परीक्षा अर्ज कोणत्याही परिस्थितीत विचारात घेतले जाणार नाहीत व या संदर्भात पत्रव्यवहार ही केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

तसेच,जुन्या अभ्यासक्रमाच्या सर्व संधी संपल्या असल्याकारणाने सदर अनुत्तीर्ण विषयांसाठी, नविन अभ्यासक्रमातील समकक्ष विषयांची परीक्षा देणे विद्यार्थ्यांना बंधनकारक व क्रमप्राप्त आहे. जे विद्यार्थी जून्या अभ्यासक्रमातील Annual Pattern चे आहेत त्यांनी नवीन अभ्यासक्रमातील सेमिस्टर पॅटर्नच्या दोन्ही सत्रांच्या संबंधित/समकक्ष दोन्ही विषयांची परीक्षा देणे अनिवार्य राहील. तसेच सदर विद्यार्थ्यांना ज्या विषयांसाठी परीक्षा देणेकरीता अतिरीक्त संधी मान्य केलेली आहे त्या विषयाचा समकक्ष विषय परीक्षा उन्हाळी – 2026 च्या परीक्षेतील वेळापत्रकात नमूद असणे आवश्यक आहे. सदर बाबीची विद्यार्थ्यांने व महाविद्यालयाने आपल्या स्तरावर खात्री करूनच संधीचे परीक्षा अर्ज भरावेत व **दि.30/01/2026** पावेतो विद्यापीठास सादर करावेत ही नम्र विनंती.

**सोबत :- संधी मान्य केलेल्या विद्यार्थ्यांची यादी - तक्ता " अ "**
**संधी नाकारलेल्या विद्यार्थ्यांची यादी - तक्ता " ब "**

आपला विश्वासू,

**(प्रा. योगेश ना. पाटील)**
**संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

Exam .Education/ Mercy Chance

जा.क्र.कबचौउमवि/7-क/शिक्षणशास्त्र/391/2025 दिनांक:- 28/01/2026

**परीक्षा उन्हाळी – 2026 मध्ये होणाऱ्या B.Ed. अभ्यासक्रमाच्या परीक्षेकरीता अध्यादेश 67 नुसार अतिरीक्त संधीबाबत.**

**तक्ता " अ " संधी मान्य केलेल्या विद्यार्थ्यांची यादी**

| Sr. No. | Student Name | College Code | PRN. NO. | Class | No of Fail Subject |
|---|---|---|---|---|---|
| 1 | SANAP PARAG SANTOSH | 130091 | 2018015400440997 | B.Ed. | 03 |
| 2 | JAIN TRUPTI NANDKISHOR | 140024 | 2017015400476736 | B.Ed. | 02 |

**तक्ता " ब " संधी नाकारलेल्या विद्यार्थ्यांची यादी**

| Sr. No. | Student Name | College Code | PRN. NO. | Class | No of Fail Subject |
|---|---|---|---|---|---|
| 1 | SHAIKH AASIF HUSNODDIN | 120129 | 2015015400480562 | B.Ed. | 16 |
| 2 | SHAIKH SHAHEEN NURODDIN | 120129 | 2015015400480554 | B.Ed. | 12 |

(प्रा. योगेश ना. पाटील)
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University 1990 'A' Grade NAAC Re-Accredited (4th Cycle) Jalgaon

Exam .Education/ Mercy Chance